A.S.D. TOPIWALLA HIGH SCHOOL MALVAN
MAJI VIDYARTHI SANGHATANA
Room 1, VH Sangaonkar Dnyanmandir, Topiwalla High School Campus
Malvan 416606 Phone: 9529786781 Email: mvs.ths@gmail.com

# टोपीवाला हायस्कूल, माजी विद्यार्थी संघटना

MVS चे क्रमांक २ चे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सभासदांसाठी दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी पावसाळी सहलीचे आयोजन केले होते. बऱ्याच विचारानंतर पनवेल येथील रिसॉर्ट यासाठी निवडले. यात मुंबई, पुणे, पनवेल, मालवण येथील २४ सभासद सामील झाले.

MVS कमिटीच्या सर्वांनी, उमेश, स्मिता, सुनील, अरविंद, दिगंबर आणि उमा यांनी कामे वाटून घेतली होती आणि ती चोख पार पाडायचा सर्वांनी मनापासून प्रयत्न केला. त्यात मोठी साथ मिळाली रिझवाना काझी, तृप्ती शिरोडकर आणि राजन तेंडोलकर यांची.

सुनील वझे आणि रिझवानाने अतिशय कल्पक आणि मनोरंजक खेळ सर्वांसाठी योजले, त्याची जय्यत तयारी केली आणि सर्वांना खेळायला लावून खूप मजा आणली.

राजनने सगळे कार्यक्रम चित्रित करण्याची जबाबदारी स्वीकारून ती उत्तमरित्या पार पाडली.

स्मिताने अत्यंत मेहनतपूर्वक अंताक्षरीचे विविध राउंड्स बनवले. ही तयारी करायला तिला किती वेळ लागला असेल आणि किती विचार करायला लागला असेल हे लक्षात येतच होतं. तृप्तीने ती conduct करण्यात स्मिताला उस्फूर्त मदत केली.

मनोरंजनाच्या कार्यक्रमात सर्वांनी उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात उमाने श्रीकृष्ण भजनावर केलेल्या नृत्याने झाली. अनिल, मुकेश, सुनील, स्मिता, उमेश सर्वांची गाणी तर मस्तच होती पण सुनीलचं स्किट, रिझवाना-सुनीलचं बातमीपत्र, स्मिताचं विनोदी स्वगत, अजितची स्वरचित कविता या गोष्टींनी खूपच बहार आणली. विष्णू, रवि, राजन, अरुणने शेयर केलेल्या आठवणी, तृप्तीचे चुटकुले, आरतीने सादर केलेली कविता सगळंच झकास! शिरीष, अवि, समद, भूषण, दिगंबर यांनी सर्वांना प्रोत्साहित केले हे ही महत्वाचेच.

सर्वांनी खिलाडूपणे शेवटच्या डान्स आणि मेडलीमधे भाग घेतला त्यामुळे कार्यक्रम वेगळ्याच उंचीवर पोचला.

भूषण, रवि, समद यांच्या प्रोत्साहनामुळे तलावात पोहण्याचा आनंद सर्वांनी मनसोक्त घेतला

दुसऱ्या दिवशी भगवान बिरमोळे च्या मदतीमुळे धरणावर जाऊन एक वेगळाच आनंद लुटला.

आधीच ज्यांच्याशी मैत्री होती ती अजून घट्ट झाली. ज्यांची आधी फक्त ओळख होती त्यांच्याशी मैत्री झाली. काही नवीन ओळखी झाल्या आणि पिकनिक संपण्याच्या आधीच त्याचं मैत्रीत रुपांतरही झालं. आणि MVS चे एक उद्दिष्ट काही प्रमाणात पूर्ण झाले.

बिरमोळे सरांचा आशीर्वाद भगवानने गोड खाऊच्या आणि कोकणच्या मेव्याच्या रुपात आमच्यापर्यंत

पोचवला.